# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

दूरध्वनी क्रमांक :
०२०- २५६९१२३३
२५६०१२५७
२५६०१२५८
२५६०१२५९

शैक्षणिक विभाग
गणेशखिंड, पुणे-४११००७
टेलिग्राफ : 'युनिपुणे'
फॅक्स : ०२०-२५६९१२३३
वेबसाइट : www.unipune.ac.in
इ-मेल: approval@unipune.ac.in

संदर्भ : सीसीओ/२८७५

दिनांक : १९/११/२०१५

मा. सचिव / मा. प्राचार्य
सर्व संलग्नित महाविद्यालये / मान्यताप्राप्त संस्था
पुणे, अहमदनगर व नाशिक

विषय : संलग्नित महाविद्यालये / मान्यताप्राप्त संस्थांमध्ये नियुक्त झालेल्या उमेदवारांचे शिक्षक मान्यतेचे प्रस्ताव ऑनलाईन पध्दतीने भरून विहित मुदतीत सादर करण्याबाबत...

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयास अनुसरून आपणास कळविण्यात येते की, संलग्नित महाविद्यालये / मान्यताप्राप्त संस्थांमध्ये नियुक्त झालेल्या उमेदवारांचे शिक्षक मान्यतेचे प्रस्ताव शिक्षकांच्या रूजू दिनांकापासून एक महिन्याच्या आत ऑनलाईन पध्दतीने भरणे आवश्यक आहे. ऑनलाईन पध्दतीने प्रस्ताव भरल्यानंतर त्याची हार्ड कॉपी रूजू दिनांकापासून एक महिन्याच्या आत शैक्षणिक विभागात सादर करणे आवश्यक आहे. ऑनलाईन पध्दतीने भरलेले प्रस्ताव व त्याची हार्ड कॉपी रूजू दिनांकापासून एक महिन्याच्या आत या विभागास सादर न केल्यास त्यांच्या शिक्षक मान्यतेच्या प्रस्तावांवर विचार केला जाणार नाही.

तसेच आपणांस विदित आहेच की, निवड समितीचे अहवाल हे निवड समितीच्या आयोजनापासून ७२ तासांच्या आत या विभागास सादर करणे आवश्यक आहे. ज्या महाविद्यालयांचे निवड समिती अहवाल काही त्रुटींमुळे मा. कुलगुरू यांनी अमान्य केल्यास व निवड समिती अहवाल ७२ तासांच्या आत या विभागास सादर न केल्यास त्यांच्या शिक्षक मान्यतेच्या प्रस्तावांवर पुढील कार्यवाही केली जाणार नाही, कृपया याची नोंद घ्यावी.

कळावे,

आपला,

१८/११/१५

उपकुलसचिव
(शैक्षणिक विभाग)